सामना उत्सव रविवार पुरवणी
गुरुजी
शोध

# साधकत्वाचे सोबती

## काहीतरी साध्य करण्यासाठी जी केली जाते ती साधना होय आणि प्रत्येक मानवी जीवनाचे अंतिम साध्य म्हणजे मोक्ष अथवा अशी समतावस्था जेथे कुठल्याही प्रकारचे द्वैत अस्तित्वात नाही. जो अशी स्थिती प्राप्त करण्याची इच्छा बाळगतो, तो मुमुक्षू आणि जो अशा इच्छेला प्रत्यक्ष कृतीची जोड देतो तो साधक.

हिंदू अध्यात्मशास्त्राप्रमाणे, जीवाच्या ८४ लक्ष योनी सांगितल्या आहेत. वृक्ष योनी, पशु योनी, तिर्यक योनी अशा निरनिराळ्या योनींमधून फिरून तो जीव मनुष्यजन्मात येतो. या जन्मात जर त्याच्याकडून सत्कर्मे घडली नाहीत आणि त्याच्या पूर्वकर्मांची निष्कृती झाली नाही तर पुन्हा त्याची अधोगती होते आणि नरदेहाचे त्याला मिळालेले वरदान जणू निष्फळ ठरते. त्याकरिताच अध्यात्मशास्त्रे सत्कर्म करण्याचा उद्घोष करीत असतात.

साधकाच्या अथवा भक्ताच्या साधनेच्या प्रवासात काही बाबी त्याला सहाय्यक ठरतात. त्यातील पहिली म्हणजे शास्त्रवचन. सर्व वेद उपनिषदांचे तात्पर्य वेदांच्या चार महावाक्यात साठविलेले आहे. या महावाक्यांचा निश्‍चित अर्थबोध होण्यासाठी मानसिक पातळीवर त्यांचे मनन आणि चिंतन जेवढे आवश्यक आहे तेवढेच भौतिक पातळीवर त्या वाक्यांच्या उपदेशांचं प्रत्यक्ष कृतीत रूपांतरसुद्धा तेवढेच आवश्यक आहे. म्हणूनच बहुतांश आध्यात्मिक संस्थांकडूनही शास्त्रवचनावर आधारित असे उपक्रम राबवले जातात, जेणेकरून समाजाची काही ना काही रूपात सेवा होऊ शकेल. आध्यात्मिक साधनेला अशी मानवतेच्या सेवेची जोड हेच वस्तुत: खरे अध्यात्म असते. बर्‍याच वेळेस आध्यात्मिक उपदेशांच्या किंवा प्रवचनांच्या श्रवणाने आपल्या मनामध्ये सत्कर्मांच्या उत्साहाचा संचार होतो. असा उत्साह हा सुद्धा साधनेला सहाय्यक असा साधकाचा मित्र असतो. दुर्दैव असे की, बर्‍याचवेळेस हा उत्साह तात्पुरता असतो. आपण काहीतरी सत्कर्म करावे असे त्यावेळी प्रकर्षाने वाटते. दोन-चार दिवस त्या दृष्टीने कृतीही केली जाते आणि मग कालांतराने उत्साहाला ओहोटी लागते. त्याला प्रमुख कारण म्हणजे वैराग्याची वानवा होय. भौतिक जगापासूनचे वैराग्यसुद्धा तत्कालिक ठरते, त्याला आपल्याकडे अतिशय समर्पक शब्द वापरला आहे- स्मशान वैराग्य! म्हणजे काही कारणाने स्मशानात जावे लागते तेव्हा तेथील वातावरणाचा परिणाम म्हणून ‘आपल्यालाही असेच एक दिवस हे जग सोडून जायचे आहे’ याचा तत्कालिक साक्षात्कार होतो आणि मग धर्मजिज्ञासा, मोक्ष, मुक्ती अशा शब्दांचे स्मरण होऊ लागते. परंतु रोजच्या जीवनक्रमाला प्रारंभ झाला की, या वैराग्याची रवानगीसुद्धा स्मशानातच होते आणि जीवनातील कर्मांतील लिप्ततेमुळे भोगाव्या लागणार्‍या सुख-दु:खाचा लपंडाव पुन्हा चालू होतो. साधनेला योग्य गती प्राप्त होण्यासाठी हा उत्साह प्रयत्नपूर्वक टिकवणे साधकाच्या व भक्ताच्या दृष्टीने आवश्यक असते.

हिंदू धर्मशास्त्रात असे वर्णन आहे की, कलियुगामध्ये ‘कली’ हा मानवी मनात सतत विक्षेप निर्माण करण्यासाठी टपलेला असतो, नव्हे त्यासाठीच त्याची नियुक्ती असते. त्याचा प्रभाव म्हणून थोड्याशा संकटानेही मनात विक्षेप निर्माण होतो, परिणामत: मनोबल ढासळते आणि साधक आतापर्यंत केलेली सगळी साधना विसरून जाऊन आयुष्याचा रस्तासुद्धा बदलायला मागेपुढे पहात नाही. यात तो स्वत:चेच नुकसान करून घेतो कारण जी काही मोक्षावस्था जवळ आलेली असते, ती आता आणखी कैक जन्म पुढे ढकलली जाते.

अशा वेळी सहाय्यक ठरते ते सद्‌गुरूवचन! प्रत्यक्ष सदेह गुरूचे मार्गदर्शन असेल तर उत्तमच, परंतु ते तसे नसले तरी भगवद्‌गीतेसारख्या ग्रंथातून जगद्‌गुरू श्रीकृष्णाने सांगितलेले तत्त्वज्ञान किंवा दासबोधासारखा सद्‌ग्रंथ हीसुद्धा एक प्रकारे मार्गदर्शक वेदवाक्येच आहेत. या ग्रंथांमध्ये त्या त्या ग्रंथकर्त्यांची शक्ती प्रोक्षित झालेली असते आणि त्या त्या ग्रंथातील सूचनावजा उपदेश आज्ञास्वरूप मानून त्यांचे कसोशीने पालन करणार्‍यांना ती शक्ती निश्‍चित मिळते. श्रद्धायुक्त मनाने ही गुरुवचने जो पाळतो तो पुढील आध्यात्मिक पायरीवर जाण्यास लायक ठरतो. मूर्तीपूजा किंवा प्रतीकपूजा करणारा साधक भक्त हासुद्धा आपली शक्ती आपल्या श्रद्धेच्या रूपाने त्या प्रतिमेवर प्रोक्षित करत असतो आणि आपल्याच एकाग्रतेद्वारे ती शक्ती परत मिळवत असतो. त्याच्यासाठी गुरुवचन म्हणजे त्याच्या अंतरात हृदयस्थ अशा त्याच्या इष्ट प्रतिमेने उच्चारलेला त्याचाच आतला आवाज असतो.

या तिन्ही आघाड्यांवर जो साधक अथवा भक्त सतत सावध असतो त्याचा काळसुद्धा मित्र बनतो. प्रत्येक कारणाचा परिणाम घडण्यासाठी कालांतर जावे लागते. आपल्या साधनेवर नितांत निष्ठा असणारा साधक हा कधीही कसलीही काळजी करत नाही. आपली नेहमीची जी काही साधना असेल; ती ठरलेल्या वेळेस पार पडली की इतर वेळी जीवनात वाटेला सुखदु:खांची किंवा साधनापूर्तीला लागलेल्या कालांतराचीही तो काळजी करत नाही. जेव्हा तो अशा निरर्थक काळजीचा त्याग करतो तेव्हा काळ स्वत: ‘जी जी’ करत त्याच्यापुढे येतो. असा निरहंकारी आणि निष्काम साधक कालांतराने स्वत: ईश्‍वर स्वरूप होतो, त्याचे वचन हे वेदवचन होते आणि त्याचे सान्निध्य हे इतर साधकांना उत्साहप्रद ठरते.

(वासुदेव वामन बापट गुरुजी, ओम सदगुरू प्रतिष्ठानच्या बोरिवली, बदलापूर, खोपोली स्थानांवर गुरुपदी विराजमान आहेत. संपर्क-bhende@indiatimes.com)

- बापट गुरुजी